# वसई-विरार शहर महानगरपालिका
## क्रीडा विभाग

दि.०२/११/२०२३

**११ व्या राष्ट्रीय वसई विरार शहर महानगरपालिका मॅरेथॉन स्पर्धा २०२३ च्या आयोजनाबाबत महानगरपालिका मुख्यालयात सर्वपक्षीय बैठक संपन्न**

वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत ११ व्या राष्ट्रीय वसई विरार शहर महानगरपालिका मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन दि.१० डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या नियोजनाकरिता व स्पर्धा यशस्वी करणेकामी सर्वपक्षीय सन्माननीय लोकप्रतिनिधी यांच्या बैठकीचे आयोजन दि.०२ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.सर्वसाधारण सभागृह, मुख्यालय, विरार पूर्व येथे मा.आयुक्त महोदयांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.

सदर सर्वपक्षीय बैठकीत आयोजकांमार्फत मॅरेथॉन स्पर्धा २०२३ च्या नियोजनाविषयी उपस्थित सर्वपक्षीय पदाधिकारी यांना माहिती देण्यात आली. तसेच स्पर्धेसंबंधी विविध विषयांवर चर्चा करणेत आली. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी स्पर्धेच्या अनुषंगाने विविध सूचनाही केल्या. तसेच ही मॅरेथॉन स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महानगरपालिकेला संपूर्ण सहकार्य करणार असल्याचेही आश्वासन सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी यावेळी मा.आयुक्त महोदयांना दिले.

**क्रीडा विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**